प्रकरण दुसरे

# १८०० ते १८७४ या काळातील कादंबरीच्या प्रेरणा व स्वरूप

प्रकरण दुसरे

# १८०० ते १८७४ या काळातील कादंबरीच्या प्रेरणा व स्वरुप

मराठी वाङ्मयाच्या इतिहासाच्या प्रस्तुत खंडात विचाराकरिता घेतलेला कालखंड हा इ.स. १८०० ते १८७४ असा आहे. या कालखंडाच्या पूर्वमर्यादा ठरविताना डोळ्यापुढे असणारी दृष्टी प्रथमच विशद करणे आवश्यक आहे. वाङ्मय विचारामध्ये वेगवेगळे कालखंड आणि त्यांच्या पूर्वोत्तर सीमा ठरविताना वाङमयविषयक घटना अथवा कारणे लक्षात घेणे उचित होय. परंतु काही वेळा हा विचार बाजूला राहून इतर कारणेच पुढे येतात. काही काळ असा गेला की ज्यावेळी इ.स. १८१८ पासून या कालखंडाचा प्रारंभ झाल्याचा उल्लेख होई. पेशवाईची व पर्यायाने मराठी राजवटीची अखेर आणि ब्रिटीश राजवटीचा प्रारंभ ही राजकिय घटना याच्या मुळाशी होती. या राजकिय स्थित्यंतराचे आपल्या वाङ्मय निर्मितीवर महत्वाचे परिणाम झाले. हे मान्य करूनही इ.स. १८१८ या वर्षाचे प्रस्तुत कालखंडाचा प्रारंभ म्हणून समर्थन वाङ्मयविचारात करणे शक्य होत नाही. एक राजवट संपली की लगेच त्या घटनेचे वाङ्मयीन परिणाम सुरु होत नाहीत; त्यास काही काळ जावा लागतो. या दृष्टीने इ.स. १८१८ ही सीमा सोडून द्यावी लागते. कित्येकवेळा वाङ्मयविचार शतकान्तराच्या कल्पनेवर आधारून करण्यात येतो. याचेही खरोखर वाङ्मयीन दृष्टीने समर्थन करता येत नाही. तथापि एका शतकाच्या अखेरीस वा पुढील शतकाच्या प्रारंभास वाङ्मयदृष्ट्या विशेष अर्थपूर्ण अशी घटना घडली असल्यास किंवा वाङ्मयास निराळेच वळण लागले. असल्यास शतकानुरोधाने कालखंड करण्यास हरकत नाही.

इ.स. १८०० ते १८७४ या कालखंडाला 'भाषांतर युग' असे म्हणतात. कारण प्रारंभीच्या काळात सर्वसामान्य प्रौढ वाचकासाठी जे साहित्य निर्माण होत होते ते पुष्कळसे भाषांतरीतच होते. जी नियतकालिके निघत होती त्यातही बराच भर इंग्रजी वृत्तपत्रातल्या बातम्यांच्या भाषांतरावरच होता. हा अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा प्रारंभ काळ असल्याने त्याला जुनी अशी परंपरा नव्हती. आणि नव्याने अन् अल्पावधीत अनेक नवनवीन विषयावर लेखन करायचे झाले तर भाषांतराखेरीच दुसरा मार्गच नव्हता आरंभी जे शालेय वाङ्मय निर्माण झाले ते सर्व भाषांतरीतच होते. देशात अनेक ठिकाणी इंग्रजी शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठाच्या स्थापना झाली होती. त्यातून इंग्रजीचा व संस्कृतचा अभ्यास केलेला वर्ग निर्माण झाला. या दोन्ही भाषेत श्रेष्ठ दर्जाचे वाङ्मय आहे. ते आपण



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

मराठीत आणले पाहिजे असे त्या काळातील सुशिक्षितांना वाटू लागले. त्यामुळे प्रथम नाटकांची भाषांतरे होऊ लागली व नंतर कादंबरी, काव्य या वाङ्मयप्रकारांची भाषांतरे होऊ लागली. स्वतंत्र निर्मितीपेक्षा अनुवादरुप निर्मितीच अधिक झाल्याने या वाङ्:मयीन युगास 'भाषांतर युग' म्हटले गेल्यास ते स्वाभाविकच होते. १८०० ते १८७८ या कालखंडाला भाषांतर युग म्हणण्याचे कारण म्हणजे इंग्रजी वाङ्मयाची ऐहिक दृष्टी, सौंदर्यनिष्ठा, सहजसुलभता, शैलीचा डौल, मानवी मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न इ. बाबीकडे जाणत्यांचे लक्ष जावून अनेक इंग्रजी शिक्षितांनी कविता, नाटके व भौतिक विद्या या क्षेत्रात भाषांतराचे काम केले.

भाषांतर युग या कालखंडला पायाभरणीचा कालखंड पूर्व तयारीचा कालखंड असेही संबोधले जाते. प्रस्तुत कालखंडाचे सर्व सामान्य स्वरुप पाहिल्यास ते नव्या वाङ्मयाच्या पूर्वतयारीचे युग होते. असे म्हणावे लागेल. अर्वाचीन मराठीमधील नवीन स्वतंत्र ललित वाङ्:मयास १८८० ते १९९० या दशकामध्येच प्रारंभ झाला. असे स्थूल मानाने म्हणावे लागते. ललित वाङ्मयच नव्हे तर चरित्रे, टीका इत्यादी तदितर वाङ्मय प्रकारांचाही खराखुरा उन्मेद याच कालावधीमुळे झाला. असे दिसून येईल. परंतु हे व्हावयास काही एकदम प्रारंभ झाला, असे नाही. त्याची पूर्वतयारी होण्यास काही काळ आवश्यक होता. प्रस्तुत कालखंड हा अशा पूर्वतयारीचा कालखंड आहे. चिपळूणकरांसारख्या प्रभावी निबंधलेखक काही आकाशातून एकदम खाली आला नाही. किर्लोस्करांची नाटके, हरिभाऊ आपटे यांचे कादंबरी वाङ्मय, केशवसुतांची नवी कविता हे वाङ्मय काही अचानकपणे अवतीर्ण झालेले वाङ्मय नव्हे. त्याची पूर्वतयारी होण्यास इतका अवधी आवश्यकच होता.

अशा प्रकारे १८७४ नंतरच्या कालखंडात मराठी वाङ्मयाने जी उत्तुंग झेप घेतली. त्याची बीजे याच काळात पेरली गेली. या काळातील भाषांतरीय ग्रंथानीच पुढील कालखंडातील साहित्यनिर्मितीसाठी पायवाट निर्माण करून ठेवली. या कालखंडातील पाठ्यपुस्तके, निबंध, कथा अनुवादीत 'नाटके, कादंबऱ्या, चरित्रे, प्रवासवर्णने, धार्मिक पुस्तके वृत्तपत्रे, नियतकालिके, मासिके यांचा विचार केल्यास मराठी साहित्य किती विविधांगी बनले हे लक्षात येईल. तरीही दत्तो वामन पोतदार म्हणतात, ''परंतु सामग्राने जेव्हा या काळातील मराठी ग्रंथ व ग्रंथकार आमच्या पुढे उभे राहतात, तेव्हा आम्हास प्रांजळपणाने असे कबूल करणे भाग पडते, की या पाऊणशे वर्षात एकही अलौकिक किंवा अजरामर ग्रंथ मराठीत झाला नाही. लहानसहान सटरफटर ग्रंथ भाराभर झाले.

'तारांगण' पुष्पळच उगवला, पण तमोनाशक चंद्र मात्र कोठेच आढळला नाही [१]!''

या कालखंडात साहित्याचा जो विकास झाला तो केवळ संख्यात्मक होता. अन् असे होणे स्वाभाविक आहे. पुष्कळ दिवस उपाशी असणाराला अन्न दिल्यानंतर तो जसा विचार न करता खात सुटतो. तशीच काहीशी अवस्था या कालखंडात साहित्याच्या संदर्भात झाली. मुद्रणकलेचा वापर केला. जाऊ लागल्याने व विचित्र विषय साहित्यासाठी उपयोगात आणणे शक्य आहे हे समजल्याने अनेक नवशिक्षित लोक गुणांचा, परिणामांचा विचार न करता भराभर लिहू लागले. पण म्हणावा तसा एकही ग्रंथ लिहिला गेला नाही. या ग्रंथानी पायातील दगडाचे काम बजावले असेच म्हणावे लागेल. पायातील दगड कोणालाही दिसत नाहीत परंतू त्याच्यामुळेच शिखराची उत्तुंगता वाढलेली असते त्याप्रमाणेच या कालखंडातील साहित्याचे योगदान पुढील अजरामर साहित्यनिर्मितीसाठी उपयोगी पडले आहे.

### इ. सन १८०० ते १८७४ या कालखंडातील साहित्याच्या प्रेरणा :-

इ.स. १८०० ते १८७४ या कालखंडातील साहित्याच्या प्रेरणा म्हणजेच पर्यायाने कादंबरी निर्मितीच्या प्रेरणा होत. हे अगोदर आपण इथे लक्षात घेतले पाहिजे. या कालखंडातील कादंबरी, कथा, नाटक, काव्य हे सर्वच वाङ्मय निर्मितीच्या प्रेरणा एकच आहेत हे अभ्यासांती आपल्या लक्षात येते.

१८०० ते १८७४ या कालखंडातील वाङ्मयाची निर्मिती ही योजनापूर्वक केलेली निर्मिती होती[२]. या प्रक्रियेत स्वाभाविकपणे झालेल्या निर्मितीपेक्षा जाणिवपूर्वक प्रयत्नामुळे झालेल्या निर्मितीचा भाग अधिक असतो. तसा तो या कालखंडातील वाङ:मयनिर्मितीमध्येही होता. असा प्रयत्न शासनसंस्थेकडून क्वचितच होई किंवा आजही होतो. गेल्या शतकात असा प्रयत्न शासनसंस्थेकडून झाला. हा या कालखंडाचा एक विशेषच मानावयास हवा. ही शासनसंस्था परकीय होती. हा या घटनेतील आणखी एक लक्षणीय भाग होय. जित लोकांच्या वाङ्मयास उत्तेजन देण्याचे किंवा प्रयत्नपूर्वक त्याची निर्मिती करण्याचे परकिय राजकर्त्यास काहीच कारण सामान्यत: असत नाही परंतू आपले राज्य स्थिरपद व्हावे त्याकरिता जित लोकांचे सहाय्य आपणास मिळत राहवे. अशा स्वार्थी हेतूने का होईना ब्रिटिश राज्यकर्त्यांनी मराठीमध्ये ग्रंथनिर्मिती करवून घेण्याचे प्रयत्न केले त्यात शालेय व शैक्षणिक वाङ्मयाचा मोठा वाटा होता हे या स्वार्थी धोरणास धरून झाले. तथापि मराठी गदयास विशिष्ट वळण लागण्याच्या दृष्टीने याचा फार उपयोग झाला. मराठी गद्याची भाषा



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

शुद्ध निर्दोष व व्यवस्थित होण्यास त्याचे फार सहाय्य झाले यात शंका नाही. गद्य वाङ्मयाची निर्मिती होण्यास परकिय शासनसंस्थेकडून शासितांच्या वाङ्मय निर्मितीबाबत इतका प्रयत्न झाल्याचे हे पहिलेच उदाहरण आहे.

**इ.स. १८०० ते १८७४ या कालखंडातील साहित्य निर्मितीमागील तीन महत्वाच्या प्रेरणा आहेत त्या खालीलप्रमाणे -**

**ज्ञानप्रसार :** गद्य वाङ्मयाचा प्रमुख हेतु ज्ञानसंपादन आणि ज्ञानप्रसार हा होता. त्यामुळे त्याच दृष्टीने त्याची निर्मिती व्हावी हे स्वाभाविक होते हे ज्ञान तत्त्वज्ञानाच्या स्वरुपाचे नसून ऐहिक, व्यवहारउपयोगी ज्ञानाच्या स्वरुपाचे होते. त्या बाबतीत आपला समाज फार काळ वंचित राहिलेला होता त्याला इतर देशांचे वा समाजाचे इतिहास तर राहोतच पण आपल्याच देशाचा व समाजाचा इतिहास माहित नव्हता. ज्या पृथ्वीवर आपण राहतो त्या पृथ्वीचे आणि तीमधील आपल्या या खंडप्राय देशाचे आपले भौगोलिक ज्ञानही अज्ञानापासून दूर नव्हते. हे सारे ज्ञान आपल्यास व्हावयास पाहिजे व त्याचा शक्य तेवढा प्रसार व्हावयास हवा अशी भूक या काळामध्ये निर्माण झाली होती. म्हणून 'अनेकविद्या मूलतत्त्व' संग्रह करण्यात आला. 'सिद्ध पदार्थविज्ञान विषयक संवाद' लिहले गेले. हिंदुस्थान आणि इंग्लंड यांच्या इतिहासाबरोबर जगाचाही इतिहास सांगण्याचा प्रयत्न झाला. कोलंबस आणि कुक यांच्या जलपर्यटनाची माहिती करून देण्यात आली. आपला प्रांत, देश, खंड आणि अखेरीस संबंध भूगोल याविषयीचे ज्ञान उपलब्ध करून देण्यात आले.

**सारांश :** ज्ञानाचे संपादन आणि त्याचा प्रसार या दृष्टीने खूपच प्रयत्न झाले. त्याचे स्वरूप फार प्रगत अथवा उच्च दर्जाचे साहजिकच नव्हते. परंतू त्यावेळी हा विचार महत्वाचा नसून उपलब्ध तुटपुंजे ज्ञानही लोकांस उपलब्ध करुन देण्याचीच गरज अधिक निकडीची होती. त्या कालखंडात निघालेली वृत्तपत्रे आणि मासिके यांची नावे पाहिली तरी ही ज्ञानसंपादनाची आणि त्याच्या प्रसाराची दृष्टी किती उत्कट होती याची कल्पना येते. ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, ज्ञानचक्षू ही काही वृत्तपत्रांची नावे आहेत तर ज्ञानचंद्रोदय, ज्ञानप्रसारक, ज्ञानदर्पण, विविध ज्ञानविस्तार आणि ज्ञानसंग्रह ही काही मासिकांची नावे आहेत. 'अज्ञान हेच मरण' हे सुभाषित या काळात प्रसिद्ध होते. या काळातील नियतकालिकांनी पुढे येऊ घातलेल्या निबंधमालेचा पाया तर घातलाच पण त्याबरोबर ज्ञानलालसाही वाढीस लावली. नियत कालिकांच्या कामगिरीचे मूल्यमापन करताना रा.श्री.जोग म्हणतात, ''प्रस्तुत

कालखंडातील नियतकालिकांच्या कार्याकडे केवळ वाङ्मयीन दृष्टीने पाहून चालणार नाही त्याचे मुख्य उद्दिष्ट आणि कार्य ज्ञानप्रसाराचे होते. साहित्यनिर्मितीचे नव्हते. हे ज्ञान ऐहिक जीवनोपयोगी असावे या गोष्टीवर विशेष कटाक्ष होता.[३]'' अर्थात असे असले तरी काव्य नाटक आणि कादंबरी या प्रमुख वाङ्मयाच्या विकासाला या नियतकालिकानीच हातभार लावला हे मान्य करावे लागेल. तसेच विविध विषयांचे ज्ञानही मराठी वाचकांना मिळू लागले. परिणामी संशोधकांना, लेखकांना आणि स्त्रियांना उत्तेजन मिळून नवनवीन लेखक पुढे येऊ लागले.

**ख्रिस्ती धर्माचा प्रसार :** परकिय शासकांशिवाय परकीय मिशनरी लोक यांचेही सहाय्य या वाङ्मय निर्मितीस होत गेले. हा या कालखंडाचा आणखी एक विशेष होय. यामागेही स्वार्थी हेतू होता व तो धर्मप्रचाराच्या स्वरुपाचा होता. या धर्मप्रचारास प्रारंभी परकिय राज्यकर्त्यांचा पाठिंबा नसला तरी विरोधही फारसा नसावा व पुढे सहाय्यही असावे म्हणूनच ख्रिस्ती धर्म प्रचारकांनी आपल्या धर्माचा प्रसार करण्यासाठी त्यांनी मराठीत ग्रंथनिर्मिती केली. यासाठी त्यांनी 'अमेरिकन मराठी मिशन' या नावाची संस्था निर्माण केली. या संस्थेत उत्तम प्रकारची पुस्तके ठेवण्यात आली. फादर स्टीफन्स, डेव्हीड, ऐलीन या ख्रिस्ती ग्रंथकारांनी ख्रिस्ती ग्रंथाचे मराठीत रुपांतर केले., मुंबई, पुणे, रत्नागिरी, बेळगांव, कोल्हापूर, बडोदे, ठाणे, सातारा ठिकाणाहून मराठी पुस्तके प्रकाशित होवू लागली. १८०० ला एकच प्रकाशक होता. १८१५ पर्यंत त्यांची संख्या २८ इतकी झाली. १८१३ ला ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आपल्या धर्मग्रंथाचा मराठीमधून परिचय करून देण्याकरिता त्यांचे भाषांतर करून व धर्मप्रचारात आवश्यक असणारे इंग्रजी प्रार्थनादी वाङ्मय अनुवादीत करून मराठी ग्रंथ आणि वाङ्मय यांच्या निर्मितीस सहाय्य केलेच पण अशा धर्मप्रचाराला विरोध करणाऱ्या ऐतद्देशियांच्या वाङ्:मयालाही त्यांच्या या प्रयत्नामुळे जन्म मिळाला व ते स्वरुपाने अधिकच मराठी उतरले. परकिय धर्मप्रचारकांचा मराठी वाङ्:मयावर हा दुहेरी उपकारच झाला असे म्हणावे लागेल. १८१३ ला ख्रिस्ती मिशनऱ्यांनी 'बायबलचे' भाषांतर 'नवा करार' असे केले. जॉन बन्ययनच्या 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' चे 'यांत्रिककमण' असे मराठीत भाषांतर हरिकेशवजी यांनी केले. तसेच १८५७ ला ख्रिस्ती मराठी सारस्वताचे जनक मानल्या जाणाऱ्या बाबा पदमनजी यांनी 'यमुनापर्यटन' ही कादंबरी लिहिली. तसेच त्यांनी 'ॲबर्टचे तर्कशास्त्र' हेही पुस्तक लिहिले या पुस्तकात बाबा पदमनजी यांनी सर्व देवांची टिंगल केली आहे कारण त्यांना ख्रिस्ती धर्माचा उद्धारक येशू ख्रिस्त यांचा प्रसार करायचा होता.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

''नव्या धर्माचा कोणताही प्रसारक स्थानिक भाषेचीच कास धरतो.[४]'' या नियमाला धरूनच मिशनऱ्यांनी निरनिराळ्या भारतीय भाषांतून ग्रंथनिर्मितीस प्रारंभ केला. पेशवाई जाण्याच्या आधी बरीच वर्षे डॉ. केरी या मिशनऱ्यांच्या नेतृत्वाने मराठी भाषेत ग्रंथनिर्मिती होण्यास सुरुवात झाली होती. १८०० मध्ये श्रीरामपुर येथे केरीने एक छापखाना काढला तसेच इंग्रजी भाषेत मराठीचे व्याकरण लिहून ते त्याने १८०५ मध्ये प्रसिद्ध केले. १८१० मध्ये मराठी कोश मोडी लिपित छापिला. सिंहासन बत्तीशी, पंचतंत्र, हितोपदेश, राजा प्रतापादित्याचे चरित्र रघूजी भोसल्याची वंशावळी इ.पुस्तके पंडित वैजनाथ शास्त्री या गृहस्थाच्या मदतीने लिहून प्रसिद्ध केली. मराठीतील पहिले पुस्तक छापण्याचा मान मिशनऱ्यांच्याकडे जातो. पहिले व्याकरण, पहिला कोश, पहिले मुद्राणालय, पहिली स्त्रियांची शाळा इ. नव्या सांस्कृतिक घडामोडींच्या प्रवर्तनाचे पहिले-पहिले श्रेय मिशनरी मंडळीच्याकडेच जाते. त्याबरोबरच बालबोधमेवा ज्ञानोदय, सत्यदिपिका, प्रवोदय या ख्रिस्ती नियतकालिकात त्यांनी गद्याचा वापर केला. त्यामुळे गद्याचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आपल्या धर्मप्रचारासाठी का होईना मराठी वाङ्मय निर्माण केले व त्यापासूनच प्रेरणा घेवून पुढील लेखक आपली वाङ्मय निर्मिती करू लागले.

**इंग्रजी विद्येचा प्रभाव :** १८१८ ला पेशवाईची व पर्यायाने मराठी राजवटीची अखेर आणि ब्रिटीश राजवटीचा प्रारंभ ही राजकीय घटना याच्या मुळाशी होती. या राजकिय स्थित्यंतराचे आपल्या वाङ्मयनिर्मितीवर महत्वाचे परिणाम झाले. इंग्रजी सत्तेबरोबरच त्यांचे वाङ्:मयही भारतात आले. जित लोकांच्या वाङ्:मयास उत्तेजन देण्याचे किंवा प्रयत्नपूर्वक त्याची निर्मिती करण्याच्या परकीय राज्यकर्त्यांस काही कारण सामान्यत: असत नाही, परंतू आपले राज्य स्थिरपद व्हावे त्याकरिता जित लोकांचे सहाय्य आपल्यास मिळत राहवे अशा स्वार्थी हेतूने का होईना ब्रिटीश राज्यकर्त्यांनी मराठीमध्ये ग्रंथनिर्मिती करवून घेण्याचे प्रयत्न केले त्यास शालेय व शैक्षणिक वाङ्मयाचा मोठा वाटा होता. हे या स्वार्थी धोरणास धरून झाले. तथापि मराठी गद्यास विशिष्ट वळण लागण्याच्या दृष्टीने याचा फार उपयोग झाला. मराठी गद्याची भाषा शुद्ध, निर्दोष व व्यवस्थित होण्यास त्याचे फार सहाय्य झाले. तसचे इंग्रजी वाङ्मयाच्या बऱ्याच अंशी आवश्यक झालेल्या अभ्यासामुळे आणि परिचयामुळे वाङ्:मय विकासाला उत्क्रांती किंवा क्रमविकास म्हणण्यापेक्षा क्रांती म्हणणेच अधिक योग्य ठरेल परंतू विकासाची वाढलेली गती एवढेच रुप या घटनेला नव्हते. अनेकवेळा अर्वाचीन मराठी वाङ्मय हे मराठी वाङ्:मयावर इंग्रजी वाङ्:मयाचे कलम झाल्यामुळे प्रतित झालेले फळ असे म्हटले जाते. कलम करण्याचे फायदे असे की प्राप्त झालेले फळ वेगळ्या स्वरुपाचे व अधिक सकस आणि भरदार असून

अल्पावधीमध्ये मिळते तसे ते मराठी वाङ्:मयाच्या बाबतीतही झाले. १८५७ ला मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. आणि इंग्रजी पुस्तकाद्वारे विचारांचे आवर्तन होऊ लागले. १८०० ते १८७४ या कालखंडाचा वाङ:मयीन दृष्टीने विचार केला असता चटकन लक्षात येणारी गोष्ट म्हणजे काव्य वा पद्य वाङ:मयापेक्षा गद्य वाङ:मयाचा विकास आणि विस्तार वेगाने झाला. गद्याच्या विविध शाखांचा उदयही याच काळात झाला. संत, पंत, तंत वाङ:मयासाठी 'पद्य' या वाङ:मय प्रकाराचाच वापर केल्याचे दिसून येते. कादंबरी, कथा, नाटक, निबंध इ. प्रकार अस्तित्वात नव्हते. परंतू इंग्रजी वाङ्:मयाचा परिणाम होवून या वाङ्:मय प्रकारातही लेखन होऊ लागले. त्यासाठी नवीन शब्दकोश व्याकरण तयार करण्यात आले. त्यामुळे गद्य वाङ्मयालाही एक प्रकारचे विशिष्ट असे वळण प्राप्त झाले. इंग्रजी राजवटीचा काळ हा भावनेपेक्षा बुद्धीवर, अध्यात्मीक चर्चेपेक्षा भौतिक घडामोडींवर भर देणारा असल्याने 'गद्य' वाङ्:मय प्रकाराची गरज भासू लागली. म्हणूनच किर्तीकरांनी टेनिसनच्या 'प्रिन्सेस' चे 'इंदिरा' असे भाषांतर केले तर महाजन यांनी 'Golden Treasuri' चे 'कुसुमांजली' असे भाषांतर केले. १८६७ मध्ये सर वॉल्टर स्कॉटच्या 'लेडी ऑफ लेक' चे 'दैवश्रेणी' असे भाषांतर केले. अशा प्रकारच्या इंग्रजी वाङ्मयाचे भाषांतर करण्यामुळे मराठी गद्याला इंग्रजी अवतार मिळाला असेच म्हणावे लागेल.

वरील तीन महत्वाच्या प्रेरणेबरोबरच इतरही आणखी काही प्रेरणा कादंबरी वाङ्मय प्रकाराच्या निर्मितीमागे म्हणजेच समग्र मराठी वाङ्मय प्रकाराच्या निर्मितीमागे ज्या प्रेरणा आहेत त्याचाही आपणाला इथे विचार करायचा आहे.

१. समृद्ध असे इंग्रजी वाङ्मय मराठीत आणावे अशी इच्छा अनेकांच्या मनात निर्माण झाली. त्यामुळे लेखनास प्रामुख्याने भाषांतरास चालना मिळाली आणि या प्रेरणेतूनच भाषांतरीत कादंबऱ्यांची निर्मिती होऊ लागली.

२. हिंदू धर्मातील अनिष्ट रुढी, परंपरा नष्ट करून समाजाचे प्रबोधन व्हावे यासाठी लेखन झाले. या लेखनातून प्रेरणा मिळून सामाजिक कादंबऱ्यांची निर्मिती होण्यास मदत झाली.

३. शिक्षणाच्या कल्पनेमुळे इतिहास, भूगोल, विज्ञान इतर शास्त्रे या संदर्भातील माहिती मराठीत आणणे क्रमप्राप्त झाले. त्यामुळे या क्षेत्रात लेखन झाले.

४. ऐहिकतेकडून भौतिकतेकडे हे सुत्र रुजू पाहत होते. त्याला अनुकूल वातावरण तयार करण्यासाठी लेखन झाले.

५. नवीन शिक्षण पद्धतीमुळे अनेकांना शिक्षण घेण्याची संधी मिळाली त्यामुळे अनेकांना नवी दृष्टी लागून ते लेखनास प्रवृत्त झाले.

६. शिक्षणाच्या प्रसारामुळे वाचकवर्गही वाढला त्याची गरज लक्षात घेऊन लेखन झाले. या शिक्षणाच्या प्रथमावस्थेचा वाङ्:मयीनदृष्ट्या विचार करिता असे दिसते की या नव्या शिक्षणाने इंग्रजीसारख्या समृद्ध भाषेशी आपली ओळख करून दिली. आशय व अभिव्यक्ती यांचे काही प्रकार नव्यानेच आपल्यासमोर आणिले, अनेक ज्ञान शाखांशी परिचय करून दिला. भाषेची उभारणी एका स्थिर पायावर केली, तिला एक नवे सांस्कृतिक मूल्य प्राप्त करून दिले. साऱ्याच गोष्टीकडे बुद्धीनिष्ट चिकित्सेने 'ऐहिक चष्म्यातून' पाहण्याची नवी दृष्टी आणिली. स्वभाषेच्या माहितीबरोबर तिच्यातील वैगुण्याचीही जाणिव करून दिली, ही वैगुण्ये दूर करण्यासाठी पद्धतशीर व संघटीतरित्या कसे प्रयत्न करता येतील याची दिशाही दाखविली. जातीनिरपेक्ष ऐहिक भूमिकेवरून विचार करणारा एक नवा वाचकवर्ग व ज्ञान प्रसाराची नवी साधने उपलब्ध करून दिली व ज्ञानाचे वितरण करणारे नवे ग्रंथकार पुढे आणिले.

७. मुद्रण कलेचा प्रारंभ झाल्याने अनेकांना लेखनाची प्रेरणा मिळाली.

८. संस्कृतमध्ये बंदिस्त झालेले साहित्य मराठीत आणावे या हेतूने लेखन केले.

९. समाजातील अनिष्ट रुढी परंपरेचा प्रहार करण्यासाठी निबंध हा वाङ्:मय प्रकार अस्तित्वात आला.

१०. इंग्रजी शासनाच्या अनुकूल धोरणामुळे लेखनाचे व प्रकाशनाचे कार्य विस्तारले.

११. खिस्ती धर्मउपदेशकांनी मराठी भाषेचा अभ्यास करून आपल्या धर्माचा प्रसार व्हावा या हेतूने काही ग्रंथ प्रकाशित केले.... त्यामुळे आपणही आता लिहिले पाहिजे या भावनेने प्रेरित होऊन लेखनकार्य झाले.



SHIVAJI UNIVERSITY ★ KOLHAPUR ★ LIBRARY

१२. इंग्रजांच्या पुढाकाराने मराठीच्या भाषिक अभ्यासास प्रारंभ झाला याच कालखंडात मराठीच्या भाषित अभ्यासास प्रारंभ झाला. इंग्रजी पद्धतीने का होईना दादोबा पांडूरंगाचे मराठी व्याकरण लिहिले गेले. मराठी भाषेचा शब्दकोशही तयार झाला. प्राचीन मराठीतील कोशग्रंथाची संख्या अल्प व त्यांचे स्वरूप अर्थनिर्णायक टिपांचे होते. भाषेतील सर्व शब्दांचा कोश करण्याची कल्पना त्यांच्या मुळाशी नव्हती. पण प्रस्तुत कालखंडामध्ये मोल्सवर्थ आणि कॅडी यांच्या मराठी-इंग्रजी आणि इंग्रजी-मराठी या कोशांनी अर्वाचीन मराठी कोश वाङ्मयाचा पायाच घालून दिला. भाषेच्या विकासास आवश्यक असणाऱ्या व्याकरण कोशांच्या विविध कार्यास, शास्त्रीय पायावर या कालखंडात प्रारंभ झाला ही गोष्ट त्यांच्या वैशिष्ट्याची निदर्शक मानली जाते.

१३. या कालखंडात मराठी गद्यासही महत्व लाभले. यापूर्वी महानुभवीय गद्य व बखर गद्य उपलब्ध होते. तरीही एकंदरीत गद्य लेखनास विशेष मान्यता लाभलेली नव्हती. अव्वल इंग्रजीमध्ये ग्रंथरचनेचे महत्व मान्य होऊन त्यास स्वतंत्र स्थान लाभले. नवीन राजवटीत व्यवहारउपयोगी शिक्षणास विशेष महत्व मिळून इतिहास. भूगोल, भोतिकशास्त्रे, व्यावहारिक निति याविषयींचे वाङ्मय निर्माण होण्याची आवश्यकता वाटू लागली व या गरजेतून नवीन गद्य वाङ्मय निर्माण झाले. या वाङ्:मयास मूळ आधार इंग्रजी वाङ्मयाचाच होता हे मराठी गद्य स्वरुपाने फारच बालबोध व अलंकरणरहित असे उतरले. या आधीच्या बखरगद्याचा डौल व सामार्थ्य त्यात दिसत नाही. त्याचा हेतू बहुतांशी ज्ञानदानाचा होता. त्यामुळे त्यात सुबोधता हा गुण अवतरला आहे. यातून मराठीची वेगळी शैली अस्तित्वात आली. वाक्यरचना व्याकरणदृष्ट्या शुद्ध व निर्दोष व्हावी असा जाणीवपूर्वक कटाक्ष पाळला गेला. मराठी गद्याचा व गद्यशैलीचा नवा आकार हा 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' म्हणून ओळखला जाऊ लागला.

असा हा १८०० ते १८७४ हा कालखंड विविधतेने नटलेला अन् भावी मराठी वाङ्:मयाचा पाया घालणारा अनेकांच्या योगदानातून साकारलेला हा कालखंड खूपच महत्वाचा वाटतो. याच कालखंडातील शिदोरी घेऊन पुढच्या कालखंडाने वाटचाल केली आहे. पहिले नाटक, पहिले काव्य, पहिली कादंबरी, पहिले वृत्तपत्र, पहिले मासिक अशा पहिल्याचा मान उपलब्ध करून देणाऱ्या या कालखंडातील कादंबरी या वाङ्मय प्रकाराच्या स्वरुपाचा आपणाला येथे अभ्यास करावयाचा आहे.

**'कादंबरी' या वाङ्मय प्रकाराचे स्वरुप :** अव्वल इंग्रजीतील कथा वाङ्:मयातूनच कादंबरीची कल्पना रुजली आणि वाढली. कमीत कमी पात्रे व कमीत कमी घटना असतात. त्या वाङ्:मय प्रकाराला लघुकथा म्हटले जात असे. १८०० ते १८७४ या कालखंडात कथा-कादंबरी असेच म्हटले जात होते. कारण या काळात कादंबरी कशाला म्हणायचे व कथा कशाला म्हणायचे याविषयी स्वरुप ठरलेले नव्हते. कथा आणि कादंबरी हे सर्वस्वी स्वतंत्र भिन्न व प्रत्येकी स्वयंपूर्व असे वाङ्मय प्रकार आहेत. कथेचे तंत्र निराळे, कादंबरीचे तंत्र निराळे हे आजचे सर्वमान्य विचार अव्वल इंग्रजी काळात नव्हते. बाणभट्टांची कादंबरी किंवा सुबन्धूची 'वासवदत्ता' या दोनच कादंबऱ्या उल्लेखणीय आहे. कारण आजच्या कादंबरी वाङ्मय प्रकाराचे विशिष्ट तंत्र जरी यामध्ये न आढळले तरी कादंबरी लेखनाचे पूर्वेकडील प्रयत्न या दृष्टीने यांचे कादंबरीच्या विकसनात महत्वाचे स्थान आहे. हिदुस्थानातील प्राचीन काळच्या या एक-दोनच कादंबऱ्या उपलब्ध असून याशिवाय दुसऱ्या काही लिहिल्या गेल्या असल्यास त्या काळाच्या उदरात गडप झाल्या आहेत.

'कादंबरी' हा वाङ:मयाप्रकार इंग्रजी राजवटीतच जन्माला आला. तसे पाहिले तर गोष्ट सांगणे आणि गोष्ट ऐकणे ही मानवाची प्रवृत्ती पुरातन आहे. पुराणे, आख्याने, बखरी इ. ग्रंथातून कादंबरीची काही अंगोपांगे जाणवतात हे खरे आहे. १९२९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'महाराष्ट्र भाषेचा कोष' या ग्रंथात असा एक अर्थ दिला आहे. यावरुन सौ.कुसुमांवती देशपांडे यांनी ''एका विशिष्ट तऱ्हेच्या कल्पित कथेला कादंबरी हे नाव मराठीत बऱ्याच आधीपासून रुढ असावे.'' असा जो तर्क केला आहे तो खरा असावा. कादंबरी या वाङ्मय प्रकाराचा उदय इंग्रजी वाङ्मयाच्या अनुकरणातून झाला आहे. या वाङ्मय प्रकाराचा उल्लेख इंग्रजीत 'नॉव्हेल' असा केला जातो. मराठीमध्ये 'नावल' हा त्यासाठी शब्द वापरण्याचा प्रयत्न झाला पण तो रुढ झाला नाही. बाणभट्टांची 'कादंबरी' हाच शब्द पुढे रुढ झाला.

कथा-कादंबऱ्या एकत्रित आढावा घेताना कथा आणि कादंबरी हे सर्वस्वी स्वतंत्र आणि भिन्न व प्रत्येकी स्वयंपूर्ण वाङ:मयप्रकार आहेत. कथेचे तंत्र निराळे आणि कादंबरींचे निराळे हे आज मान्य झालेले विचार असले तरी प्रस्तुत कालखंडातील वाङ:मयाशी सुसंगत नाहीत. अनेक कथा मिळून एक कादंबरी होत नाही. किंवा एका कादंबरीतून अनेक कथा तयार करिता येणार नाहीत. हा तंत्रविचार पुस्तकी पांडित्याचा ठरावा, असे पुरावे या काळात मिळतात एक तर दशकुमारचरित किंवा



UNIVERSITY ... KOLHAPUR

अरबी गोष्टी किंवा पंततंत्र हितोपदेश या पद्धतीच्या साखळीच्या रचनेची विपुलता या काळात आढळते. दुसरे अनेक कादंबऱ्यातून सुट्या कथांची सांधेजोड करण्याची पद्धतीही स्वीकारलेली दिसते. तिची सुरुवात 'यमुना-पर्यटनापासूनची' आहे. तेव्हा कथांच्या गुंफणीतून कादंबरीच्या रचनेकडे वळायचे, हा या काळातील बहुविध कादंबऱ्यांचा एक विशेष म्हणावा लागेल. हा प्रकार रचनाकारांच्या 'आखूड' समजुतीतून उद्भवलेला असो, की त्यांच्या पुढील धर्मकथांच्या वा कलाकथांच्या आदर्शामधून उद्भवलेला असो, मराठी कादंबरी ही कथेतून स्फुरलेली वाढलेली आहे हे ऐतिहासिक सत्य नाकारिता येणार नाही.[५]

इ.स. १८०० ते १८७४ या कालखंडातील कादंबरी वाङ्मयाचे प्रामुख्याने चार भाग पडतात.

१. भाषांतरीत कादंबऱ्या.

२. अद्भुतरम्य कादंबऱ्या

३. ऐतिहासिक कादंबऱ्या

४. सामाजिक कादंबऱ्या

**१. भाषांतरीत कादंबरी :** १८१८ ला पेशवशईचा अस्त झाला व इंग्रजी अंमल भारतावर सुरु झाला. भिन्न भाषिय कादंबऱ्यांची मराठी भाषांतरे वा रुपांतरे ही मराठी कादंबरीच्या क्षेत्रातील एक वेगळी पण बरीच रुळलेली वाट म्हणता येईल.[६] मराठी कादंबरीच्या प्रारंभापासून ही वाट ठाऊक होती. एवढेच नव्हे, अशा भाषांतरापासूनच मराठी कादंबरीला प्रारंभ झाला. कादंबरी वाङ्मयाला लागणारी सामग्री इंग्रजीपूर्व काळातही मराठी वाङ्मय प्रकारात विखुरलेली होती. परंतू प्रत्यक्ष कादंबरीचा उगम मात्र अव्वल इंग्रजीमध्ये व इंग्रजी वाङ्मयाच्या संस्कारामुळे व अनुकरणामुळे झाला या अनुकरणातूनच भाषांतरीत कादंबरीचाही जन्म झाला. या प्रथमावस्थेत बराच इंग्रजी कादंबऱ्यांची मराठीत भाषांतरे केली गेली. तसेच १८०६ ला 'इसापनितीचे' मराठी भाषांतर 'बालबोध मुक्तावली'असे करण्यात आले तर वैजनाथ पंडित यांनी सिंहासन बत्तिशी, पंचतंत्र, हितोपदेश, राजा प्रतापादित्याचे चरित्र याही पुस्तकांचे मराठीत भाषांत केले. याबरोबरच सदाशिव काशिनाथ छत्रे यांनी १८२८ मध्ये 'बालमित्र व इसापनिती' ही कथात्मक पुस्तके लिहिली. मराठीत जिला कादंबरी म्हणता येईल अशी एक कथा भाषांतराच्या रुपाने १८४१ मध्ये मराठीत आली. जॉन बन्यनच्या 'पिलाग्रिम्स प्रोग्रेस' चे हरिकेशवजी यांनी भाषांतर करून 'यांत्रिक क्रमण' या नावाने प्रसिद्ध केली.

ही मराठीतील पहिली भाषांतरीत कादंबरी म्हणता येईल. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी अरबी भाषेतील सुरस कथांचे मराठीत भाषांतर केले. याशिवाय हतिमताई, वेताळ पंचविशी, सिंहासन बत्तिशी ही पुस्तके प्रसिद्ध झाली. रॉबिन्सन, क्रूसो, गालिव्हरचा वृत्तांत इ. इंग्रजी पुस्तकांचे मराठीत भाषांतर झाले. बकासुराची बखर, चंद्रहासाची बखर, भागवताची बखर इ. पौराणिक कादंबऱ्याही लिहिल्या गेल्या. एकंदरीत प्रारंभीच्या काळातील वाङ्मय भाषांतर स्वरुपाचे होते. अर्थात याला कारणही तसेच होते. पेशवाई नष्ट झाल्यावर लेखनाला प्रेरणा ठरेल असे कोणतेही वातावरण नव्हते तसेच देशात नुकतेच इंग्रजी राज्य अवतरल्याने त्यांच्या वाङ्:मयाचे आकर्षण नवशिक्षितांना वाटू लागले होते. यातूनच भाषांतरीत प्रधान पुस्तके लिहिली गेली.

**२. अद्‌भुतरम्य कादंबरी :** भाषांतरीय कादंबरी ही अद्‌भुतरम्य कादंबरीची पाऊलवाट आहे. हे वळण वाईच्या लक्ष्मणशास्त्री हळबे यांनी ओळखले होते. अव्वल इंग्रजीत सांस्कृतिक विकासाबाबत मराठी समाजाला पुन्हा जणू बाल्यावस्था प्राप्त झाली होती. या बाल्यावस्थेच्या सुचक अशा दोन गोष्टी मराठी कथा-कादंबऱ्या वाङ्मयात प्रतिबिंबित झालेल्या दिसतात. पहिली प्रवृत्ती अनुकरणाची. भाषांतरीत कथा कादंबरीच्या रूपाने ही प्रगट झाली. अद्‌भुताची आवड ही बाल्यावस्थेची दुसरी सूचक गोष्ट. त्यावेळची महाराष्ट्राची एकंदर सामाजिक, राजकिय परिस्थिती ही अद्‌भुताच्याच अभिरुचीला अनुकुल झालेली होती. पारतंत्र, पराभूत मनोवृत्ती, पराक्रमाची प्रवृत्ती, भावलेली मने, शिथिल निक्रिय उत्तर पेशवाईतील थिल्लर विलासाची प्रवृत्ती रेंगाळलेल्या पौराणिक बखरी व उर्दू-फारशीतील भाषांतरित कथावर पोसलेली आळसी-आळसी मने, अद्‌भुताकडे अधिकच आकृष्ठ झाली. कर्तबगारीला अवकाश नव्हता. पण स्वप्नाळू विलास परतेला भरपूर वाव होता. अशा संस्थानिक, जहागिरदार, इनामदार यांच्याकडून तत्कालीन मिळमिळीत जीवनात काल्पनिक कथांच्या आश्रयाने अद्‌भुताचा अंश आणू पाहणाऱ्या अद्‌भुतरम्य कादंबऱ्याची मागणी होऊ लागली.

तत्कालीन समाजाच्या अभिरुचीचे हे स्वरूप अचूक हेरुन वाईच्या लक्ष्मणशास्त्री यांनी 'मुक्तामाला' ही १८६१ ला पहिली अद्‌भुतरम्य कादंबरी लिहिली. ही कादंबरी त्या काळात खूपच लोकप्रिय ठरली त्याच्या अनेक आवृत्ती निघाल्या. हळबेशास्त्री यांनी जुन्या पद्धतीने संस्कृतचे अध्ययन केले असले तरी वृत्तीने ते सुधारक होते. परमहंस सभेचे ते सभासद होते. त्यांच्या सुधारक मताची छाया 'मुक्तामाले' वर पडलेली आहे. मुक्तामालेचा बाप शांतवर्मा याने मुक्तामालेची गाठ पडल्यावर,



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

तिच्या पतिमरणाची वार्ता खरी मानून तिचे केशवपण करण्याची जेव्हा समाजपरंपरेप्रमाणे तयारी केली तेव्हा तिच्या मनातील वादळ तर हळव्यांनी चित्रित केले आहेच, पण त्या बरोबर शांतिवर्म्याला व्यक्तिश: केशवपणाची रुढी अतिशय अश्लाघ्य वाटत होती असेही दाखविले आहे. 'मुक्तामाला' या कादंबरीत जुने संस्कृत वळण आणि इंग्रजी कादंबरीचे वळण एकमेकांत मिळून गेले आहे.

यानंतर हळबे यांनीच दुसरी 'रत्नप्रभा' ही कादंबरी १८७८ ला लिहिली. या दोन्ही कादंबऱ्यात काही वास्तवाचे सुर आहेत, असहाय्य स्त्रीजीवन, केशवपन, रुढी उल्लेख, पुनर्विवाहाची कल्पना आहे. परंतु मुख्यत: या कादंबऱ्या योगा-योगावर आधारलेल्या, अतिरंजित, अद्‌भुताचे चित्रण करणाऱ्या, कृत्रिम भाषाशैलीच्या अशा आहेत. यानंतर रिसबुड यांनी 'विश्वासराव' व 'वसंतकोकिळा' या कादंबऱ्या लिहल्या तर इतर लोकांनीही मंदाकिनी, चंद्रकांत, विलासिनी, विचित्रपुरी, राजा मदन अशा कादंबरीचे लेखन केले. हळवे परंपरेतील या सर्वच अद्‌भुतरम्य कादंबऱ्या घटनाप्रधान, घटनांचे पर्यवसन नेहमी आनंद पर्यवसायी आहे. अतिशोक्ती, कृत्रिम अलंकृतीचे विलक्षण वेड, सुक्ष्म स्वाभाविक व्यक्तीदर्शन नाही. निरस शब्दालंकाराचा नाद, कृत्रिम क्लिष्ट भाषा, घटनाचित्रणातही कार्यकारण भाव जाणीव नाही. त्या काळात श्री का.बा.मराठे यांनी 'नावल व नाटक' याविषयी निबंध लिहला होता. त्यात ते म्हणतात 'जेवढे पुरुष तेवढे मदनाचे पुतळे, स्त्रिया तिलोत्तमा. प्रत्येक शोकस्थळी मरणाचा शोक, आनंदस्थळी स्वर्गासारखा आनंद दुसरी उपमाच नाही. या कादंबऱ्यांनी वाचकांना कादंबरी या वाङ्‌मय प्रकारच्या वेगळ्या अस्तित्वाची जाणीव दिली.

अत्यंत अद्‌भुतता, अवास्तवता, वादळे, मारामाऱ्या, अव्यवहारी गोष्टींची रेलचेल, उल्कापात, मृत्यू यांची वर्णने दैनंदिन जीवनातील दु:ख विसरण्यासाठी अशा प्रकारचेवातावरण या कादंबऱ्यात येत होते. या प्रकारच्या कादंबऱ्यात उदंड योगा-योग होता. तसेच नायक-नायिकांचे वातावरण होते. संस्कृत साहित्याचा मराठी अवतार म्हणजे या काळातील कादंबरी होय. कादंबऱ्यातील भाषा संस्कृतप्रचुर होती. अलंकाराचे अपरिहार्य, पंडिती भाषा, दिर्घतम पांडित्याचा मिलाप या प्रकारच्या कादंबऱ्यात होता. अद्‌भुतरम्य कादंबरीच्या संदर्भात रिसबुडांच्या एका विधानाचा विचार केला पाहिजे ते म्हणतात, ''हिंदू लोकांच्या आयुष्यामध्ये अतिशय मोहक सद्‌गुण किंवा दुर्गुण हे दोन्ही आढळत नाहीत व हीच नॉव्हेन्ससारखे ग्रंथ करण्यास हल्ली अडचण होते. या हिंदूच्या स्वभावदौर्बल्यामुळे आपण 'अद्‌भुत गोष्टींच्या कबजात' येतो असा रिसबुडांचा प्रामाणिक अभिप्राय

होत. आपले आयुष्य मिळमिळीत असल्यामुळे कादंबरीने निर्माण केलेल्या अद्‌भुत जगात वावरताना तृप्तीचे सुख मिळत असावे असे म्हणता येईल. सत्याभासाचे समाधान हा अद्‌भुतरम्य कादंबरीचा एक परिणाम म्हणून मानावा.[७]

**३. ऐतिहासिक काबंदरी :** ऐतिहासिक कादंबरी म्हणजे अद्‌भुतता व वास्तवता यांना जोडणारा पूल आहे. अद्‌भुतरम्य कादंबरीचे थोडे सुधारित रुप म्हणजे ऐतिहासिक कादंबरी होय. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रजी राजवटीने अन् साहित्याने घातलेली भुरळ कमी होऊ लागली पारतंत्र्याच्या कल्पनेने अनेक लोक अंतर्मुख बनून आपल्या देशाच्या अवनितीबद्दल विचार करु लागले. हिंदुस्थानच्या इतिहासाविषयी व परंपरेविषयी अभिमान जागृत होऊ लागला व त्यातूनच ऐतिहासिक कादंबऱ्यांचा जन्म झाला. डॉ.अ.ना.देशपांडे म्हणतात, ''सांस्कृतिक प्रगतीच्या पहिल्या अवस्थेत असताना अद्‌भुतात रमणारे मराठी मन एकदम वास्तववादी न बनता मध्ये काही काळ ते ऐतिहासिक कथेच्या रमणीय प्रदेशात रमले. १८७१ मध्ये गुंजीकरांची 'मोचनगड' ही पहिली कादंबरी अवतीर्ण झाली. ही कादंबरी शिवकाळाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली आहे. या कादंबरीत ऐतिहासिक म्हणून लिहिलेला बराच भाग काल्पनिक आहे. हा आक्षेप मान्य करुनही या कादंबरीने ऐतिहासिक कादंबऱ्यांची मुहूर्तमेढ रोवली हे सत्य नाकारता येत नाही. ऐतिहासिक कादंबरीचा मराठीतील हा पहिलाच प्रयोग असल्यामुळे तो यशस्वी करण्याकरिता आवश्यक असणारे इतिहासाचे ज्ञानही त्यावेळी तुटपुंजे असल्यामुळे तो प्रयोग बराच सदोष झाला. मात्र त्याने ऐतिहासिक कादंबऱ्याचा पायंडा पडला. पुढे ऐतिहासिक कादंबऱ्याची निर्मिती वाढू लागली. जनमाणसात इतिहासप्रेम जागृत झाले होतेच. 'मोचनगड' नंतर नागेश बापटांनी 'संभाजी', 'चितुर गडचा वेडा', 'पानिपतची मोहिम' या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. याच काळात चि.मो.आपटेयांची शिवकाळावर आधरलेली 'पुतळाबाई' ही कादंबरी लिहिली. ही कादंबरी खूपच गाजली. इतिहासातील बीजे घेवून ती फुलविणे, राष्ट्राभिमान जागृत करणे, नवीन पिढीला इतिहासाची ओळख करुन देणे या प्रधान हेतूने या कादंबऱ्या लिहिल्या. गेल्या वि.ज.पटवर्धन यांनी १८५७ च्या युद्धावर 'हंबीरराव व पुतळाबाई' ही कादंबरी लिहिली. तसेच त्यांची दुसरी गाजलेली पहिल्या बाजीरावाच्या काळावर लिहलेली 'जुना वाडा' ही कादंबरी होय. या कादंबरीच्या प्रस्तावनेत लेखक म्हणतो की, ''हा ग्रंथ वाचून वाचणाऱ्याच्या मनात थोडा जरी देशांभिमान उत्पन्न झाला तरी ग्रंथकर्त्यांच्या श्रमाचे चीज होईल.''.

यावरून या कादंबरी लेखनामागील हेतू लक्षात येतो. अर्थात या कादंबऱ्या निर्दोष होत्या असे नव्हे त्यात अनेक दोषही होते. या कादंबऱ्याचे मूल्यमापन करताना डॉ.भालचंद्र फडके म्हणतात. ''या ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या लेखकांना लेखनाविषयी हौस होती पण त्यांच्या लेखनात कलावंताच्या दृष्टीचा अभाव होता. या कादंबरीकारांनी संवादाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला आहे त्यामुळे वातावरण निर्मिती करणाऱ्या स्थळ कालादी वर्णनांना अंग चोरून उभे राहवे लागले. शिवाय ऐतिहासिक साधनांचा पुरावा फारसा उपलब्ध नसल्याने ऐतिहासिक घटनातून त्यांना ऐतिहासिक वास्तव उभे करता आले नाही.'' अर्थात हा आक्षेप लक्षात घेऊनही ऐतिहासिक कादंबऱ्यांचा पायंडा पडून पुढे अनेक दर्जेदार ऐतिहासिक कांदबऱ्यांची निर्मिती झाली हे विसरून चालणार नाही. काही पौराणिक बखरीही लिहिल्या गेल्या. भागवताची बखर, विराट पर्वाची बखर, तसेच परभाषेतील ऐतिहासिक कादंबऱ्यांचीही भाषांतरे झाली. ऐतिहासिक नाटकमाला, नाट्यकथावली, कादंबरीकल्प यासारख्या मासिकातून अनेक ऐतिहासिक कथा प्रसिद्ध होत राहिल्या. ऐतिहासिक सत्याशी इमान त्याच्याशी सुसंगत अशी कल्पिताची मदत, विशिष्ट ऐतिहासिक प्रत्ययकारी चित्र रेखाटण्याचे कौशल्य मात्र या ऐतिहासिक कथा कादंबऱ्यात आढळून येत नाही. त्याबाबतीत प्राथमिक अवस्थाच आहे.

**४. सामाजिक कादंबरी :** इंग्रजी शिक्षणणाने स्वसमाजातील दोष दिसू लागले. ते दूर करण्यासाठी उपाय सुरु झाले. त्यावेळी लोकांची अभिरुची ऐतिहासिकतेकडून वास्तवतेकडे वळली. अद्भुतप्रिय कालखंडातही वास्तवाचा छोटा प्रवाह वाहत होताच. इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे आपल्या लोकांना आपला धर्म व आपल्या रुढी तपासून पहाव्याशा वाटल्या. समाजसुधारणेची चळवळही चालू होतीच. बालविवाह, स्त्रीशिक्षण, विधवा विवाह इ. प्रश्नावर उलट-सुलट चर्चा होत होतीच. या पार्श्वभूमी ''यमुनापर्यटन'' ही मराठीतील पहिली सामाजिक कादंबरी १८५७ मध्ये बाबा पद्मजी यांनी लिहली. विधवेच्या प्रश्नावर ही कादंबरी आधारलेली आहे. वैधव्यामुळे स्त्रीचे जीवन कसे उध्वस्त होते त्याचे परिणामकारक चित्रण केले अहे. याबरोबरच केशवपन, स्त्रीशिक्षण स्त्रीकडे उपभोग वस्तू म्हणून पाहण्याचा दृष्टीकोन विधवाविवाह असे अनेक प्रश्न त्यात हताळले आहेत. यानिमित्ताने बाबांनी हिंदू धर्मातील दोष स्पष्ट केले आहेत. स्वत: बाबांनी हिंदू धर्माचा त्याग करून खिस्ती धर्माचा स्विकार केल्याने त्यांनी या कादंबरीतून अत्यक्षपणे हिंदू धर्मावर टिका केली आहे व येशूचे महात्म्य वर्णिले आहे. या कादंबरीची साधी सरळ परंतू ख्रिस्ती वळणाची भाषा आहे. बाबांच्या अंतकरणातील तळमळ व वस्तुस्थितीचे दर्शन यामुळे या कादंबरीत चांगलीच मान्यता मिळाली. तशी ही कालानुक्रमे मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी निश्चित 'सामाजिक कादंबऱ्या' हा वाङमयप्रकार प्रबोधनासाठी

उपयुक्त करु शकतो हे ''यमुनापर्यटन'' ने सिद्ध केल्याने त्या वळणाऱ्या नंतर विविध सामाजिक प्रश्न हाताळणाऱ्या अनेक कादंबऱ्या लिहिल्या. बालविवाहमुळे उद्भवलेल्या समस्यांचे विवेचन करणारी विनायक दामले यांची 'अवलिया' (१८५९) ही कादंबरीही खूप लोकप्रिय झाली. तर ओक यांनी 'शिरस्तेदार' (१८८१) ही कादंबरी लिहिली. इ.स. १८७९ साली श्री रहाळकर यांची 'नारायणराव व गोदावरी' ही सामाजिक कादंबरी प्रसिद्ध झाली. महाराष्ट्रातील मध्यमवर्गाचे वास्तवदर्शी चित्रण करण्यात या कादंबरीने चांगले यश मिळविले आहे. नायिका विवाहाबाबत स्वनिर्णयाचा हक्क बजावते. या कादंबरीतील नव्या जाणिवेची कांतीकारक प्रवृत्ती विशेष उल्लेखनीय आहे. ही कादंबरी शोकांत आहे. या कादंबरीचे कथानक पुढे प्रसिद्ध झालेल्या हरिभाऊंच्या 'मधली स्थिती' कादंबरीशी जुळते. लेखकाची वर्णनशैली हरिभाऊंच्या युगाची पूर्वसुचना देते. विनायक राव ओक यांच्या 'शिरस्तेदार' या छोट्या कादंबरीत लाच खाण्यापासून होणाऱ्या दुष्परिणामाचे प्रत्ययकारी, वेधक वर्णन आले आहे. यशवंतराव, आत्मचरित्र वेणू, रंगराव या वासुदेव बळवंताच्या कांतीची पार्श्वभूमी असलेली श्री पंडित यांची 'सुशिल यमुना' अवतरली. या सुमारास फ्रेंच व इंग्रजी भाषेतील सामाजिक कादंबऱ्यांची भाषांतरे झाली. जग हे असे आहे, वाईकर मरजी मधूरा, नाहीच ना ऐकायचे इ.

अशा प्रकारे मराठी कादंबरीच्या पहिल्या तीस वर्षात तिच्यावर इंग्रजी फारसी व संस्कृत या तिन्ही भाषांतील कथा वाङ्मयाचा संस्कार झालेला आढळून येतो तर तिच्या प्रवृत्तीत द्विविधता दिसून येते. तिचा एक प्रवाह अद्भुतरम्य अलंकार प्रचूर करमणूकप्रधान होता. आणि दुसरा वस्तूनिष्ट व सामाजिक ध्येयवादाने प्रेरित झालेला होता. पहिली प्रवृत्ती स्थितीनिष्ठ व परंपरेचा पुरस्कार करणारी असते तर दुसरी प्रगतिशिल जीवनाचे स्वरुप जाणून घेवून त्यात परिवर्तन घडवून आणण्याची आकांक्षा बाळगणारी मानवाच्या वास्तव सुखदु:खाशी समरस होणारी असते. या द्विविध प्रवृत्ती वेगवेगळ्या काळात सर्वच वाङमयात व कलाक्षेत्रात आढळून येतात. कारण त्या जीवनव्यापी आहेत. कधी त्यापैकी एकीचे प्राबल्यच होते तर कधी दूसरीचे. त्यांच्या या सापेक्ष न्यूनधिक्यावर त्या-त्या युगातील प्रमुख प्रवृत्ती अवलंबून असतात. मराठी कादंबरीची वेगवेगळी युगेही या प्रवृत्तीच्या परस्पर प्रमाणाने निर्णित झालेली आढळून येतील.

काही थोडे अपवाद वगळता या कालखंडातील अद्भूत ऐतिहासिक वा सामाजिक कादंबरी या ना त्या रीतीने बोधपरच होती. संस्कृत, फारसी, इंग्रजी भाषेतील जे कथासाहित्य या लेखकांच्या

वाचनात आले त्याचा प्रभाव म्हणून म्हणा किंवा त्याचे अनुकरण करावे म्हणून म्हणा कादंबरी या ना त्या धर्तीवर रचायची असा लेखकांचा प्रयत्न होता. कादंबरीतून एक वास्तवचित्र गोचर करावे अशा जाणिवेचा जन्म या कालखंडात झालेला दिसतो. कथानक, व्यक्तिचित्रण, मनोविश्लेषण, संवाद, निवेदनरिती, वातावरणनिर्मिती, आरंभ व अखेर इत्यादी कादंबरीच्या अंगोपागांची स्पष्ट जाणिव या लेखकांना नव्हती हे तर खरेच आहे; पण सगळेच लेखक एका रेषेत पुढे सरकणारे कथानक रचीत होते. 'संवादाचा' वापर अतिशय रीतीने करीत होते. आणि वर्णन करण्याची त्यांची हौस वाढत होती. म्हणजे एका अर्थाने या कालखंडाने मराठी कादंबरीच्या जडणघडणीत थोडा हातभार लावला.

**समारोप :** हरिभाऊपूर्व कादंबरीची स्थिती तिने साधलेले यश याबद्दल समीक्षक म्हणतात नवनिर्मितीची आवड, समकालीन काळातील घडामोडी कधी उघड तर कधी आडपडद्याने वर्णन करण्याची हौस वाङ्‌मयीन वर्णने, जुन्या साहित्यशास्त्राच्या कसोटीला उतरतील असे करण्याची रुढीप्रियता मराठी भाषा एकसारखी चलनात राखून तिचे ग्रांथिक स्वरुप व्युत्पन्न अभिजात आणि विस्तृत करण्याची कुशलता, अद्‌भुताची प्रीती व वास्तवाची थोडीफार जाणिव इ. वैशिष्ट्ये स्पष्टपणे दिसतात.

## संदर्भ - टीपा


१. दत्तो वामन पोतदार - (मराठी गद्याचा इंग्रजी अवतार, व्हीनस प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्रमांक - पंधरा.)

२. रामचंद्र श्रीपाद जोग (मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड - ४) महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, पुष्ठ क्रमांक - ४ दुसरी आवृत्ती.)

३. रा.श्री.जोग (मराठी वाङ्:मयाचा इतिहास खंड - ४) महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे. पृष्ठ क्रमांक २०० दुसरी आवृत्ती १९७३.

४. रा.श्री.जोग (मराठी वाङ्:मयाचा इतिहास खंड - ४) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे. पृष्ठ क्रमांक - ५४, दुसरी आवृत्ती १९७३.

५. रा. श्री. जोग (मराठी वाङ्:मयाचा इतिहास खंड, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे. पृष्ठ क्रमाकं २६२ दुसरी आवृत्ती १९७३)

६. कुसुमावती देशपांडे (मराठी कादंबरीचे पहिले शतक) मराठी साहित्यसंघ मुंबई, प्रथमावृत्ती २० जुलै १९५३ पृष्ठ क्रमांक - २२३.)

७. जोग बनहट्टी - (प्रदक्षिणा - खंड पहिला) कॉन्टीन्टल प्रकाशन पुणे, नववी आवृत्ती - १९९७).




SHIVAJI UNIVERSITY